# लढ रहा है किसान, साथ है सारा हिंदोस्तान!

## कृषी कायद्यांचा निषेध! शेतकरी आंदोलनाच्या समर्थनार्थ भारत बंद!



केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांच्या निषेधार्थ सुरू असलेले देशव्यापी आंदोलन आणखी तीव्र करण्यासाठी ३ डिसेंबर रोजी महाराष्ट्रातही तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समितीने घेतला आहे. केंद्रातील भाजपचे सरकार दिल्लीच्या सीमेवर सुरू असलेले शेतकरी आंदोलन बळाच्या जोरावर दडपून टाकू पाहत आहे. शेतकऱ्यांवर पाण्याचा मारा करून, अश्रूधुराचा वापार करून, हायवेवर खड्डे खणून, शेतकरी नेत्यांना स्थानबद्ध करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करत आहे. केंद्र सरकारच्या या दडपशाहीला न जुमानता लाखो शेतकरी दिल्लीच्या सीमेवर ठिय्या देऊन बसले आहेत. हे आंदोलन अधिक तीव्र करण्याची हाक अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समितीने दिली आहे.

**हे तीन कायदे एवढे वादग्रस्त का ठरले यामागील कारणे समजून घेऊ:**

### १) अत्यावश्यक वस्तू कायद्यातील (अ.व.का) बदल

१९५५ साली अंमलात आलेल्या ह्या कायद्यामुळे सरकारला व्यापारी आणि कंपन्यांकडून होणाऱ्या अन्नधान्याच्या साठेबाजीवर आणि किंमतीवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार मिळाला आहे.

नवीन कायदा ह्या कायद्याला कुचकामी करून टाकतो. नवीन बदलांनुसार फक्त युद्ध, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती इ. असामान्य परिस्थितीतच सरकार कडधान्य, डाळी, कांदे-बटाटे, खाण्याचे तेल आणि तेलबीया अशा पदार्थांच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवेल.

**साठेबाजी आणि किंमतीवरील निर्बंध हटवले, तर मोठे व्यापारी (त्यांचे संघ) मोठ्या प्रमाणावर साठेबाजी करून, बाजारात अन्नधान्याचा तुटवडा निर्माण करतील आणि किंमती वाढवतील.** अत्यावश्यक वस्तू कायदा अस्तित्वात असताना देखील कांद्याच्या बाबतीत हे नेहमीच होताना आपण पाहतो.

### २) कंत्राटी शेती

या कायद्याद्वारे कोणत्याही शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या कंपनीला, मोठ्या व्यापाऱ्याला किंवा कृषी कंपनीला शेतकऱ्यांसोबत शेती विषयक करार करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

### ३) कृषी उत्पन्न बाजार समिती कायदे मोडीत

**ह्या कायद्यानुसार भारतातील कृषी उत्पादनाच्या खरेदी-विक्रीची संपूर्ण व्यवस्थाच मोडीत काढली जाणार आहे.** सामान्य शेतकरी लोभी आणि ताकदवर व्यापाऱ्यांकडून लुबाडला जावू नये, ह्या उद्देशाने ही व्यवस्था बनवली गेली होती. तसेच ह्या समित्या सरकारच्या अन्नधान्य खरेदीची केंद्र बनल्या होत्या. व्यापारी आणि दलालांनी कार्टेल्स (संघ) बनवून शेतकऱ्यांना लुटले आहे हे खरं आहे, पण ह्या भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या नावाखाली, सरकार मोठमोठ्या कृषी कंपन्यांना शेतकऱ्यांकडून माल खरेदी करण्याची परवानगी देत आहे.

### ह्या कायद्यांचे परिणाम:

या तीनही कायद्यांना आपण जोडूनच पाहिले पाहिजे. या सर्वांमुळे **मोठ्या व्यापाऱ्यांना आणि कंपन्यांना कृषी व्यापारावर पूर्णपणे नियंत्रण मिळवणे सोपे जाईल.** पण यातील तिसऱ्या मुद्द्यामुळे शेतकरी अधिक संतप्त झाले आहेत. एपीएमसींचे प्रचलित वर्चस्व नष्ट झाले, तर खासगी ऑपरेटर्स/व्यापारी/अडते दरांवर नियंत्रण ठेवतील अशी भीती त्यांना वाटत आहे. या खासगी बाजारांना कोणतेही शुल्क, उपकर किंवा कर द्यावा लागणार नाही अशी तरतूद नवीन कायद्यात आहे. एकंदर नवीन कायदे खासगी बाजारांना झुकते माप देणारे आहेत.

सरकारचे म्हणणे आहे की शेतमालासाठी खूप कंपन्या येतील, शेतकऱ्यांकडून माल विकत घेण्यासाठी त्यांच्यात स्पर्धा होईल आणि यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळेल. पण प्रत्यक्षात मोठ्या कंपन्या एकमेकांसोबत स्पर्धा करत नाहीत, कारण ह्या कंपन्यांनी जर परस्परात किंमतींची स्पर्धा केली तर त्या एकमेकांनाच नष्ट करतील. त्यामुळे किमतीच्या

बाबतीत त्या परस्पर सहकार्याच्या मार्गानेच काम करतात. त्या कार्टेल्स बनवतात आणि एकमेकांमध्ये बाजार विभागून घेतात.

## महाकाय विदेशी कृषी कंपन्या

या कृषी कंपन्या आणि विशेषतः विदेशी कंपन्या महाकाय आहेत. उदाहरण द्यायचं तर **बायर ही एकटी कंपनी संपूर्ण महाराष्ट्राचा शेतमाल विकत घेऊ शकते!** रिलायन्ससारखी कंपनी जेव्हा रिटेल क्षेत्रात ताकदीनं उतरण्याच्या तयारीत आहे, त्याचवेळी ही सगळी पार्श्वभूमी तयार करून ठेवली जातेय ही बाब देखील दुर्लक्षित करून चालणार नाही.

## शेती व शेतकरी संपवण्याचे षडयंत्र



ह्या बलाढ्य कंपन्या संपूर्ण प्रदेशातील शेतकऱ्यांसोबत करार करतील, मोठे भांडवल गाठीशी असल्यामुळे सुरुवातीला शेतकऱ्यांना चांगला भाव देतील. साठेबाजीची मर्यादा काढून टाकल्यामुळे आणि कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा मोडीत काढल्यामुळे ते शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात पिके खरेदी करतील आणि साठवून ठेवू शकतील. अशा प्रकारे काही वर्षातच ह्या महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्या भारतातील शेतमाल व्यापारावर मक्तेदारी प्रस्थापित करतील. जेव्हा त्यांची मक्तेदारी प्रस्थापित होईल, तेव्हा सर्व छोटे व्यापारी संपुष्टात येतील. त्यानंतर ह्या **कंपन्याच शेतमालाचा भाव ठरवतील आणि शेतकऱ्याला कमी भाव देतील**, कारण तेव्हा शेतकऱ्यांपुढे दुसरा काहीच पर्याय नसेल.

दुसऱ्या बाजूला मंड्यांमध्ये शेतकऱ्यांकडून माल विकत घेणाऱ्या लाखो छोट्या व्यापाऱ्यांचे, दलाल आणि आडत्यांचे व्यवसाय बंद पडतील.

## उपासमार-कुपोषण-महागाईचा भस्मासुर

सगळ्यात महत्त्वाचा परिणाम म्हणजे ह्यामुळे देशातील **'उपासमार आणि कुपोषणाची समस्या'** आणखीच गंभीर होईल. मंड्या ह्या सरकारच्या अन्नधान्य खरेदीच्या मुख्य केंद्र आहेत. अन्नधान्याची सरकारी खरेदी बंद करून हळूहळू सार्वजनिक वितरण व्यवस्था संपवून त्याऐवजी शेतकरी आणि ग्राहकांच्या खात्यांत थेट रक्कम जमा करण्याची योजना लागू करणे हे मोदी सरकारचे घोषित उद्दिष्ट आहे. **सार्वजनिक वितरण व्यवस्था मोडित काढल्यामुळे खाजगी व्यापारी साठेबाजी करून अन्नधान्यांच्या किमती वाढवतील.** त्यामुळे देशातील कोट्यवधी गरीब जनतेवर मोठे संकट कोसळणार आहे. खरंतर साठेबाजीला आणि भाववाढीला आळा घालण्यासाठीच सार्वजनिक वितरण व्यवस्था देशात लागू केली गेली होती.

अशा प्रकारे हे तीन कायदे पारित करून 'देशभक्त' भाजपा सरकार फक्त विदेशी कंपन्यांना भारतीय शेती व्यवस्थेवर नियंत्रण प्रस्थापित करण्याची परिस्थितीच बनवत नाहीये तर देशाला भूक आणि कृत्रिम दुष्काळाच्या दरीत ढकलत आहे.

देशभरातल्या शेतकरी संघटना याला विरोध करत आहेत. आम्ही शेतकऱ्यांच्या या आंदोलनाचे समर्थन करत आहोत.

## आम्ही सरकारकडे खालील मागण्या करत आहोत:



- केंद्र सरकारने केलेले तीनही शेतकरी विरोधी कायदे कुठल्याही अटींविना तात्काळ रद्द करा.
- सरसकट सर्व पिकांसाठी उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव जाहीर करा.
- केंद्र व राज्य शासनाकडून शेतीक्षेत्रावर केला जाणारा खर्च दुप्पट करण्यात यावा. बियाणे-खतांवरील अनुदान वाढवावे.
- भारतीय शेतकऱ्यांची अवस्था सुधारण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने नोव्हेंबर २००४ मध्ये स्वामीनाथन आयोगाची स्थापन केली. या आयोगाने सादर केलेल्या अहवालातील शिफारसींना लागू करा.


**अंगमेहनती कष्टकरी संघर्ष समिती** **लोकायत**

**संपर्क पत्ता:** ८९, न्यू टिंबर मार्केट, भवनी पेठ, पुणे - 411042.

नितीन पवार – 9270432153, ऋषिकेश –9423507864